पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

**पुणे महानगरपालिका**
**सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक २४ )**
**शुक्रवार, दिनांक १७/६/२०२२, सकाळी १०.३० वाजता**

**पुणे महानगरपालिकेची मासिक (सर्वसाधारण) सभा (माहे जून २०२२ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक १७/६/२०२२ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त कार्यालयातील सभागृहात भरली होती.**

**सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. विक्रम कुमार,भा.प्र.से. | - | प्रशासक तथा महापालिका आयुक्त |
| २) | मा.रविंद्र बिनवडे | - | अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल) |
| ३) | मा.प्रशांत वाघमारे | - | शहर अभियंता |
| २) | मा. राजेंद्र मुठे | - | उपायुक्त (दक्षता व मालमत्ता व्यवस्थापन) |
| ३) | मा. माधव जगताप | - | उपायुक्त (अतिक्रमण-सुरक्षा) |
| ४) | श्री. शिवाजी दौंडकर | - | नगरसचिव तथा सह महापालिका आयुक्त |

**मा. विक्रम कुमार, भा.प्र.से, महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे मनपा हे सभापती म्हणून अध्यक्षस्थानी होते.**

**मा. प्रशासक :** सभा सुरु करावी.

**नगरसचिव :** माहे जून २०२२ कार्यपत्रिका. आज झालेल्या मा.स्थायी समिती, मा.विधी समिती व मा.शहर सुधारणा समितीमधून खालील विषय माहे जून २०२२ च्या कार्यपत्रिकेवर दाखल करुन घेणेसाठी आलेले आहेत. सदरचे विषय पुढीलप्रमाणे -

**विषय क्र.१/६७**

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आपत्तीव्यव/१७८, दि. १५/६/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६३, दि.१७/६/२०२२

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

अग्निशमन दलामध्ये अतितात्काळ साहित्याची (बोट) नवीन HDPE Rescue Boats (As per GSDRF Specification) बोटी ओबीएम ( Out Boat Motor ) मशीन जोडता येऊ शकेल अशा बोटी खरेदी करणे या कामासाठी र.रू. ८० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करून देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका, बजेटकोड नं. RE11R101 थ- नैसर्गिक आपतीग्रस्त/ अपघातग्रस्तांना तातडीच्या खर्चासाठी मदत | ५० लक्ष | --- |
| २ | बजेटकोड नं. RE11R104 नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती आणि मोठे अपघात यांमध्ये प्रतिसादशोध, बचावकार्य व नियंत्रण कक्ष संचलन इ. तातडीने करावयाच्या खर्चासाठी | १० लक्ष | --- |
| ३ | बजेटकोड नं. RE11R105 १५ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत आपत्ती व्यवस्थापनेच्या दृष्टीने जनजागृती करणे . | १० लक्ष | --- |
| ४ | बजेटकोड नं. RE11R106 आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करणे . | १० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम -** | | | |
| | आपत्ती व्यवस्थापन विभाग, पुणे महानगरपालिका,नवीन HDPE Rescue Boats (As per GSDRF Specification)बोटी ओबीएम ( Out Boat Motor )मशीन जोडता येऊ शकेल अशा बोटी खरेदी करणे. | --- | ८० लक्ष |

**विषय क्र.२/६८**

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१८१, दि. १५/६/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६४, दि.१७/६/२०२२

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

मे. महाराष्ट्र राज्य सरकार व म्युनीसीपल कर्जरोखेधारण करणार यांचे माहितीकरिता दिनांक ३१/३/२०२१ अखेर पुणे महानगरपालिकेने देणे असलेल्या कर्ज/कर्जरोखेच्या रकमांचे व कर्ज/कर्जरोखे बाकी संबंधी इतर माहिती दर्शविणारे तक्ते सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध करणेस व त्यांच्या प्रती मे. महाराष्ट्र राज्य सरकार व मा. अकौंटंट जनरल, मुंबई यांचेकडे पाठविण्याची अलहिदा तजवीज करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.३/६९**

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/१८४, दि. १५/६/२०२२ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६५, दि.१७/६/२०२२

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स तत्वावर दिलेल्या सदनिकांचे करारनामे करणेसाठी खालील बाबींस कार्योत्तर मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यातयेतआहे.

१) यापूर्वी प्रकल्पबाधीत व्यक्तींना लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स तत्वावर दिलेल्या संबंधित सदनिकाधारकांसोबत ११ महिन्यांचे ऑनलाईन नोंदणीकृत लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स तत्वावरील भाडे करारनामे करून घेणेस,

२) तसेच यानंतर वेळोवेळी प्रकल्पबाधीत व्यक्तींना लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात येणाऱ्या संबंधित सदनिकाधारकांसोबत ११ महिन्यांचे ऑनलाईन नोंदणीकृत भाडे करारनामे करून घेणेस,

३) मृत भाडेकरूंच्या वारसांचे नावेलिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स तत्वावर भाडे करारनामे करणेकरिता प्राप्त होणारे अर्ज स्विकारून( महा ई-सेवा केंद्राकडील वारस अधिकार प्रतिज्ञापत्र व अन्य वारसांचे संमतीपत्रासह ) सदर वारसांचे नावेशासन मान्य सेवापुरवठादार संस्थेकडून ११ महिन्यांचे ऑनलाइन नोंदणीकृत लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स तत्वावरील भाडे करारनामे करणेस,

४) उपरोक्त शासनमान्य सेवापुरवठादार यांचेकडून लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स तत्वावरील ११ महिन्यांचे भाडे करारनामे करून घेणेस व आगामी कालावधीत आवश्यकता भासल्यास नव्याने शासनमान्य सेवापुरवठादार यांचेकडून मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या यादीतील भाडेकरूंचे ११ महिन्यांचे ऑनलाईन नोंदणीकृत भाडे करार करून घेणेस,

५) प्रकल्पाबाधीत व्यक्तींना दिलेल्या सदनिकांचे लिव्ह अ‍ॅण्ड लायसेन्स भाडेकरार सदनिका वापरास दिलेल्या दिनांकापासून दि. ३१/१२/२०२१ पर्यंतचा सदनिका वापर कालावधी नियमान्वित करणेस,

**विषय क्र.४/७०**

संदर्भ- १) सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विभागाकडील जा.क्र.६६३९/२२,दि.०४/०५/२०२२ रोजीचे Ni
२) भवनरचना कार्यालय जा.क्र.भरका/२१,दि.०४/०४/२०२२ रोजीचे पत्र.
३) मा.मुख्य सभा ठराव क्र.८२७ व ८३२,दि.१७/०२/२०२२
४) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१७७,दि.१५/०६/२०२२ चे पत्र.
५) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३६, दि. १७/६/२०२२
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६८, दि.१७/६/२०२२

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ बावधन स.नं.६/१०/१ येथील राजमाता जिजाऊ संकुल या इमारतीमधील तळमजला व पहिला मजलासह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांना भाडे तत्वावर उपलब्ध करून देणेबाबत खालील बाबींस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. पुणेपेठ बावधनस.नं.६/१०/१ येथीलराजमाता जिजाऊ संकुल या इमारतीमधीलसंपूर्ण तळ मजला (१४८.५१चौ.मी.) व पहिला मजला (२३२.२६ चौ.मी.) इतकी बांधिव जागा मा.सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारीपुणे म निश्चितकेलेल्या र.रू.७८,४५०/- या मासिक भाड्यानेउपलब्धकरूनदेणेस.
२. मा.सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेबरोबर १५ वर्षे कालावधीचा करारनामा करणेस.
३. मिळकतवाटप नियमावलीनुसार भाड्यामध्ये दर ३ वर्षांनी १२% भाडेवाढ करणेस.
४. मा.मुख्य सभा ठराव क्र.८२७ व ८३२ दि.१७/०२/२०२२ निरस्त करणेस.

**विषय क्र.५/७१**

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१८२,दि.१५/०६/२०२२ चे पत्र.
२)मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३७, दि. १७/६/२०२२
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६९,दि.१७/६/२०२२

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे गंज पेठ टिंबर मार्केट प्लॉट नं.१११ चे उत्तरेस असलेली २०'X ९०' मापाची मोकळी जागा ही मिळकत ३ वर्षे कालावधीकरीता भाडेतत्वावर देणेबाबत निविदेतील क्र.१ चे निविदाधारक श्री.चैतन्य रतन किराड पत्ता-२६९, नाना पेठ,हिंदमाता चौक, पुणे-४११००२ यांनी देऊ केलेली मासिक र.रू.६४,०५२/-(अक्षरी रक्कम रू.चौसष्ट हजार बावन्न रूपये फक्त) ही मनपा निर्धारित मासिक र.रू.६३,०५२/-(अक्षरी त्रेसष्ट हजार बावन्न रूपये फक्त) पेक्षा र.रू.१,०००/- (अक्षरी र.रू.एक हजाररूपये फक्त) जास्तआहे. त्याचप्रमाणेताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे भाडेतत्वावर देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतीवर्षी मक्ता रकमेवर वस्तू आणि सेवाकर प्रचलित दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकतवाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार निविदाधारक श्री.चैतन्य रतन किराड यांचेसोबत करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.६/७२**

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांचे जा.क्र.मआ/माव्य/१८३,दि.१५/०६/२०२२ चे पत्र.
२)मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३८, दि. १७/६/२०२२
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२७०,दि.१७/६/२०२२

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे पेठ रविवार घरांक ५२९ येथील व्यवसायिक गाळा क्र.३(क्षेत्रफळ ४१६.२५ चौ.फुट) हा ३ वर्ष कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेबाबत निविदेतील क्र.१ चे निविदाधारक वृषभ कन्स्ट्रक्शन तर्फे विशाल दिलीप सोनवणे पत्ता-५१,श्रीकृष्ण हौसिंग सोसायटी, चंदननगर, खराडी, पुणे-४११०१४ यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रू.२९,२००/-(अक्षरी रक्कम रू.एकोणतीस हजार दोनशे रूपये फक्त) ही मनपा निर्धारित मासिक र.रू.२९,१७०/-(अक्षरी एकोणतीस हजा रएकशे सत्तर फक्त) ने र.रू.३०/- ने जास्त प्राप्त झालेली आहे. त्याप्रमाणे आणि शासकीय नियमानुसार प्रती महा मक्ता रकमेवर वस्तू आणि सेवाकर प्रचलित दराने भरून घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकतवाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७/७३**

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/१७२,दि.१३/०६/२०२२ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.२ , दि.१७/६/२०२२

-----

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील खातेप्रमुख या संवर्गात १० वर्षे पेक्षा जास्त सलग सेवा झालेल्या अधिकाऱ्यांच्या नामभिधानसह महापालिका आयुक्त ('जॉईंट म्युनिसिपल कमिशनर') असे बदलास खालील बाबींस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**१)** श्रीमती उल्का गणेश कळसकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या पदास दिनांक २४/०४/२०१९ पासून सह महापालिका आयुक्त (मुख्य लेखा व वित्त अधिकारी) असे संबोधण्यास तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पदास जे अधिकार आहेत ते सर्व अधिकार, सह महापालिका आयुक्त (मुख्य लेखा व वित्त अधिकारी) यांना देण्यास,

२)श्री.शिवाजी भिकाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी यांच्या पदास दिनांक १७/०३/२०२० पासून सह महापालिका आयुक्त (मुख्य कामगार अधिकारी) असे संबोधण्यास तसेच मुख्य कामगार अधिकारी या पदास जे अधिकार आहेत ते सर्व

अधिकार, सह महापालिका आयुक्त (मुख्य कामगार अधिकारी) यांना देण्यास,

३)पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील खातेप्रमुख संवर्गातील जागेवर नियुक्त अधिकाऱ्यांची सलग दहा वर्षेसेवा किंवा जास्त कालावधीसाठी कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना बढतीची संधी नाही म्हणून त्यांचे पदाचे नामभिधान बदलून ते सह महापालिका आयुक्त (जॉईंटम्युनिसिपल कमिशनर) असे करणेस. मात्र ज्या अधिकाऱ्यांचा हुद्दा अधिनियमात हुद्दा नमूद केल्यामुळे हा हुद्दा बदलता येणार नाही, त्यांना सह महापालिका आयुक्त समकक्ष समजण्यात यावे व त्यांना सह महापालिका आयुक्त यांना देण्यात येणारे सर्व फायदे व मान्य दराने विशेष वेतन देण्यास,

**विषय क्र.८/७४**

संदर्भ- १) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.टीपीएस १८२२/व्ही.आयपी/१८२२/प्र.क्र.४३/२०२२/नवि १३, दि.२८/३/२०२२
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/१२६,दि.२६/०५/२०२२ चे पत्र.
३) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३१, दि.१७/६/२०२२

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

मौजे आंबेगाव बु. स.नं.४३(पै.) अस्तित्वातील ६.०० मी.रूंद रस्त्याची रूंदी १२.०० मी. केलेली उक्त रस्त्यालगतचे कमाल बांधकाम क्षमतेनुसार भुखंड विकसीत होणेकरीता रस्ता यांना जोडणारा ६.०० मी. रस्ता १२.०० मी. करणेकरीता एम.आर.टी.ॲक्ट चे कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेस. त्या अनुषंगाने हरकती व सूचना मागविण्यासाठी दैनंदिन वर्तमानपत्रात जाहीर प्रकटन देणेस. शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध करणेबाबतची कार्यवाही करणेस प्राप्त हरकतीसुचनांवर मा.शहर अभियंता यांच्याकडे सुनावणी घेणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.९/७५**

संदर्भ- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ साप्र/ १९२, दि. १७/६/२०२२ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४०, दि.१७/६/२०२२

----

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील अभियांत्रिकी संवर्गातील कार्यकारी अभियंता ( स्थापत्य ) वर्ग-१ ( पे मेट्रिक्स ड -२५: ७८८००-२०९२००) + मान्य भत्ते या पदाची रिक्त पदे तात्पुरती पदोन्नतीने भरणेसाठी पदोन्नती समितीने शिफारस केलेल्या खालील प्रमाणे निवडयादी व प्रतिक्षायादीस तसेच शासनाकडील वेळोवेळीचे प्राप्त होणारे आदेश व आस्थापना विषय बाबींचा विचार करून खालील सेवक यांची तात्पुरती पदोन्नतीने नेमणूक करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

तक्ता क्र. १ - निवडयादी :-

| अ.क्र. | सेवकाचे नांव | नेमणुकीचा प्रवर्ग | जातीचा प्रवर्ग | जन्मदिनांक | कार्यकारी अभियंता या पदावरील दिनांक | शैक्षणिक पात्रता | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती हर्षदा विकास शिंदे | अ.जा. | अ.जा. | १६-०२-७१ | १५-०३-१६ | एम.ई. (सिव्हील ) | २८-०२-२९ |

तक्ता क्र. २ - प्रतिक्षा यादी :-

| अ.क्र. | सेवकाचे नांव | नेमणुकीचा प्रवर्ग | जातीचा प्रवर्ग | जन्मदिनांक | कार्यकारी अभियंता या पदावरील दिनांक | शैक्षणिक पात्रता | सेवानिवृत्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री इंद्रभान निवृत्ती रणदिवे | अ.जा. | अ.जा. | ०२-०७-६७ | १५-०३-१६ | बी.ई. ( सिव्हील ) | ३१-०७-२५ |

**मा. प्रशासक :** विषय कार्यपत्रिकेवर दाखल करुन घ्या.

**एकूण ९ विषय कार्यपत्रिकेवर दाखल करुन घेतले.**

**मा. प्रशासक :** विषय घ्या.

**नगरसचिव :** मा.सभापती/प्रशासक यांनी विषय घेण्याचे आदेश दिले आहेत.

**विषय क्र. ४०**

पुणे महानगरपालिकेची हद्दवाढ झालेने नविन जकातनाका व वाहनतळ करणेसाठी बालेवाडी स.नं. २६/१ अ पैकी ४०,४०१.८२ चौ.मी. क्षेत्राचा वापर मल्टी मॉडेल ट्रान्झिटहबचा प्रकल्प उभारणेबाबत, मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/माव्य/८५ , दि. ९/५/२०२२ चे पत्र

**ठराव क्रमांक :– ५९**

**संदर्भ–** **१) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, महसूल शाखा क्र. पमह/१२४०/९९ दि. १६/०८/१९९९ चे आदेश**
**२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे पत्र आ.क्र. ४०२६, दि. १०/०७/२०१८.**
**३) मा.महा.आयुक्त यांचे जा. क्र. मआ/माव्य/८५ , दि. ९/५/२०२२ चे पत्र.**
**४) स्थायी समिती ठराव क्र.१४५,दि.२३/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन ङ्ग**

**पुणे महानगरपालिकेची हद्दवाढ झालेने नविन जकातनाका व वाहनतळ करणेसाठी बालेवाडी स.नं. २६/१ अ पैकी ४०,४०१.८२ चौ.मी. क्षेत्राचा वापर मल्टी मॉडेल ट्रान्झिटहबचा प्रकल्प उभारणेस मा. महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळेल या भरवशावर पी.पी.पी. तत्वावर सदर मल्टीमॉडेल ट्रान्झिट हब पुणे महानगरपालिकेकडून विकसीत करणेस असा सुधारीत प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ४० संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ४१**

पुणे महानगरपालिका हद्दीतील कमीत कमी ४०० भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या मोफत नसबंदी शस्त्रक्रिया करण्यासाठी CANINE CONTROL AND CARE या संस्थेस ०५ वर्षे कालावधीसाठी संयुक्त प्रकल्पाद्वारे चालविण्यास देणेसाठी व त्यांच्याशी करारनामा करणेबाबत, महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०७, दि. १७/५/२०२२ चे पत्र

**ठराव क्रमांक :– ६०**

**संदर्भ–** **१) महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०७, दि. १७/५/२०२२ चे पत्र.**
**२) स्थायी समिती ठराव क्र.१५८,दि.२३/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**नायडू हॉस्पिटल येथील डॉगपॉंड संयुक्त प्रकल्पाद्वारे चालविणेसाठी निविदा मागविली असता आलेली एकच निविदा** CANINE CONTROL AND CARE **या खाजगी संस्थेस भटक्या व मोकाट कुत्र्यांची मोफत नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यासाठी ०५ वर्षे कालावधीसाठी चालविणेस देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ व पुणे महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २००८ मधील भाग १० (२३) अन्वये मा.महा.आयुक्त यांचे विषय पत्रासोबतच्या संयुक्त प्रकल्प प्रस्तावातील अटी व शर्तीच्या अधीन राहून फायनल प्लॉट क्र. ९८, नायडू हॉस्पिटल, केनेडी रोड, संगमवाडी येथील जागेत अस्तित्वात असलेले संगोपन व लसीकरण केंद्र , पुणे ४११००१ ( मिळकतीचे क्षेत्रफळ ८७८.९० चौ.मी. व बांधकामाचे क्षेत्रफळ १७३.७८ चौ.मी.) हे पुणे महानगरपालिका हद्दीतील कमीत कमी ४०० भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या मोफत नसबंदी शस्त्रक्रिया करण्यासाठी CANINE CONTROL AND CARE या संस्थेस ०५ वर्षे कालावधीसाठी संयुक्त प्रकल्पाद्वारे चालविण्यास देणेसाठी व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ४१ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ४२**

पुणे महानगरपालिका हद्दीतील मोहननगर, बाणेर येथील डॉगपॉंड मध्ये मासिक कमीत कमी ३०० कुत्र्यांची भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या मोफत नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यासाठी CANINE CONTROL AND CARE या संस्थेस ०५ वर्षे कालावधीसाठी

संयुक्त प्रकल्पाद्वारे चालविण्यास देणेसाठी व त्यांच्याशी करारनामा करणेबाबत, मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१०९, दि. १७/५/२०२२ चे पत्र

**ठराव क्रमांक :– ६१**

**संदर्भ–** **१) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०९, दि. १७/५/२०२२ चे पत्र.**
**२) स्थायी समिती ठराव क्र.१५९,दि.२३/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**मोहननगर, बाणेर येथील डॉगपाँड संयुक्त प्रकल्पाद्वारे चालविणेसाठी निविदा मागविली असता आलेली एकच निविदा CANINE CONTROL AND CARE या खाजगी संस्थेस भटक्या व मोकाट कुत्र्यांची मोफत नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यासाठी ०५ वर्षे कालावधीसाठी चालविणेस देणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियिम १९४९ मधील कलम ७९ व पुणे महानगरपालिका मिळकतवाटप नियमावली २००८ मधील भाग १० (२३) अन्वये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या संयुक्त प्रकल्प प्रस्तावातील अटी व शर्तीच्या अधीन राहून बाणेर सर्व्हे नं. ५६,५७,५८ मोहननगर ( मिळकतीचे क्षेत्रफळ ६७५ चौ.मी. व बांधकामाचे क्षेत्रफळ २३१.८१ चौ.मी.) हे पुणे महानगरपालिका हद्दीतील मोहननगर, बाणेर येथील डॉगपाँड मध्ये मासिक कमीत कमी ३०० कुत्र्यांची भटक्या व मोकाट कुत्र्यांच्या मोफत नसबंदी शस्त्रक्रिया व लसीकरण करण्यासाठी CANINE CONTROL AND CARE या संस्थेस ०५ वर्षे कालावधीसाठी संयुक्त प्रकल्पाद्वारे चालविण्यास देणेसाठी व त्यांच्याशी करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ४२ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ४३**

मे.महाराष्ट्र राज्य सरकार व म्युनीसीपल कर्जरोखेधारण करणार यांचे माहिती करिता दिनांक ३१/३/२०२० अखेर पुणे महानगरपालिकेने देणे असलेल्या कर्जाच्या रकमांचे व कर्जबाकी संबंधी इतर माहिती दर्शविणारे तक्ते सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध करणेस व त्यांच्या प्रती मे. महाराष्ट्र सरकार व मा.अकौंटंट जनरल, मुंबई यांचेकडे पाठविण्याची अलहिदा तजवीज करणेबाबत, मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/९७,दि.११/५/२०२२ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ६२**

**संदर्भ–** **१) महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/९७,दि.११/५/२०२२ चे पत्र.**
**२) स्थायी समिती ठराव क्र.१८९,दि.२३/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**मे.महाराष्ट्र राज्य सरकार व म्युनीसीपल कर्जरोखेधारण करणार यांचे माहिती करिता दिनांक ३१/३/२०२० अखेर पुणे महानगरपालिकेने देणे असलेल्या कर्जाच्या रकमांचे व कर्जबाकी संबंधी इतर माहिती दर्शविणारे तक्ते सरकारी गॅझेटमध्ये प्रसिद्ध करणेस व त्यांच्या प्रती मे. महाराष्ट्र सरकार व मा.अकौंटंट जनरल, मुंबई यांचेकडे पाठविण्याची अलहिदा तजवीज करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ४३ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ४४**

पुणे महानगरपालिकेकडे ओपन ॲक्सेसद्वारे पॉवर खरेदी करणे या प्रकल्पा अंतर्गत मे. महाप्रीत (MAHAPREIT) या शासकीय संस्थेबरोबर Power Purchase Agreement (PPA)करण्यास ज्या मध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४०/Kwhया दराने वीज खरेदी करण्यास तसेच ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी मे. महाप्रीत (MAHAPREIT) या शासकीय संस्थेसोबत एसपीव्ही (SPV) स्थापित करणेस व SPV मधील सदस्य नियुक्तीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देणेबाबत, मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१०४, दि.१२/५/२०२२ चे पत्र

**ठराव क्रमांक :– ६३**

**संदर्भ–** **१) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८०९,दि. २८/१२/२०२१**
**२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१०४,दि.१२/५/२०२२ चे पत्र.**

**३) स्थायी समिती ठराव क्र.१९२,दि.२३/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**पुणे महानगरपालिकेकडे ओपन ॲक्सेसद्वारे पॉवर खरेदी करणे या प्रकल्पा अंतर्गत मे. महाप्रीत (MAHAPREIT) या शासकीय संस्थेबरोबर Power Purchase Agreement (PPA)करण्यास ज्या मध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४०/Kwhया दराने वीज खरेदी करण्यास तसेच ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी मे. महाप्रीत (MAHAPREIT) या शासकीय संस्थेसोबत एसपीव्ही (SPV) स्थापित करणेस व SPV मधील सदस्य नियुक्तीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देणेसाठी खालील बाबींस मान्यता देण्यात येत आहे.**

**१. पुणे महानगरपालिकेकडून ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी मे. महाप्रीत (MAHAPREIT) या शासकीय संस्थेबरोबर Power Purchase Agreement (PPA) करण्यास ज्या मध्ये २० वर्षापर्यंत र.रू. ३.४०/Kwh या दराने वीज खरेदी करणेस व २० वर्षापुढील ५ वर्षापर्यंत निशुल्क वीज पुणे मनपास मिळणेस.**

**२. ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करण्यासाठी मे. महाप्रीत (MAHAPREIT) या शासकीय संस्थेसोबत एसपीव्ही (SPV) स्थापित करणेस व SPV मधील सदस्य नियुक्तीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देणेस,**

**३. सदर SPV साठी Share Holder Agreement करणेस .**

**निर्णय :– विषय क्र. ४४ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ४५**

प्र.क्र.२४, शिवाजीनगर, गावठाण फायनल प्लॉट क्र. के येथील आर्टीफीशियल क्लायबिंगवॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा /९२,दि.११/०५/२०२२ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ६४**

**संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/९२,दि.११/०५/२०२२ चे पत्र.**
**२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२१,दि.२७/५/२०२२.**
**३) स्थायी समिती ठराव क्र.२०३,दि.२७/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**प्र.क्र.२४,शिवाजीनगर, गावठाण फायनल प्लॉट क्र. के येथील आर्टीफीशियल क्लायबिंगवॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ४ निविदांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे अ.क्र. १ चे निविदादार स्पोटर्स क्लायबिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, पत्ता–फ्लॅट नं.३, आनंद कॉम्पलेक्स, अलंकापुरी हाउसिंग सोसा, वनाझ कॉर्नर पौडरोड, पुणे–३८ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रू.२१,२५०/–(र.रू.एकवीसहजार दोनशे पन्नास फक्त) म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा ४,२५०/– ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ६ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ४५ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ४६**

पुणे पेठ शिवाजीनगर फा.प्लॉट नं.८९ येथील जलतरण तलाव व व्यायामशाळा लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचेजा.क्र.मआ/क्रिडा/९३, दि.११/०५/२०२२ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ६५**

**संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/९३,दि.११/०५/२०२२ चे पत्र.**
**२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२,दि. २७/५/२०२२**
**३) स्थायी समिती ठराव क्र.२०४,दि.२७/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**पुणे पेठ शिवाजीनगर फा.प्लॉट नं.८९ येथील जलतरण तलाव व व्यायामशाळा लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या १ निविदांपैकी अ.क्र. १ चे निविदादार श्री.अमित नामदेव निम्हण, १३०/४,पुण्याई बंगला, सुसरोड, पाषाण, पुणे–२१ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रू.७२,१८७.५०/–(र.रू.बाहत्तरहजार एकशे सत्याऐंशी पैसे पन्नास फक्त) म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा ६,५६२.५०/– ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ६ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

निर्णय :– विषय क्र. ४६ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ४७

प्र.क्र.३०, पुणे पेठ वारजे येथील स्पोटर्स कॉम्पलेक्स (क्षेत्रफळ ३०२.०० चौ.मी.) लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/९५, दि.११/०५/२०२२ चे पत्र

ठराव क्रमांक :– ६६

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रिडा/९५,दि.११/०५/२०२२ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.२३,दि.२७/५/२०२२
३) स्थायी समिती ठराव क्र.२०५,दि.२७/५/२०२२

-----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

प्र.क्र.३०, पुणे पेठ वारजे येथील स्पोटर्स कॉम्पलेक्स (क्षेत्रफळ ३०२.०० चौ.मी.) लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या १ निविदांपैकी अ.क्र. १ चे निविदादार 'फोकस आर्चरी ॲकेडमी',९ ब शुभाशिर्वाद, पटवर्धन बाग,एरंडवणा,पुणे–०५ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रू.७८,०००/–(र.रू अठ्ठ्याहत्तर हजार फक्त) म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपेक्षा २०६/– ने अधिकदराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्तीनुसार निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ६ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचेसोबत करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

निर्णय :– विषय क्र. ४७ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ४८

पुणे पेठ हडपसर स.नं.१३४/१ड/२ येथील तळमजल्यावरील शोरूम क्र.४ (क्षेत्रफळ ३०० चौ.मी.) हा १० वर्ष कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेबाबत,मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांचे जा.क्र.मआ/माव्य/९८, दि.११/०५/२०२२ चे पत्र

ठराव क्रमांक :– ६७

संदर्भ– १) इकडील जा.क्र.माव्य/५५७६,दि.१/१२/२०२१ चे मूल्यांकन
२) मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/९८८,दि.०३/०३/२०२२ रोजीची मान्यता.
३) बँक ऑफ इंडिया यांचे दि.३१/०१/२०२२ चे पत्र.
४) मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांचे जा.क्र.मआ/माव्य/९८,दि.११/०५/२०२२ चे पत्र.
५) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २४, दि. २७/५/२०२२.
६) स्थायी समिती ठराव क्र.२०६,दि.२७/५/२०२२

-----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ हडपसर स.नं.१३४/१ड/२ येथील तळमजल्यावरील शोरूम क्र.४ (क्षेत्रफळ ३०० चौ.मी.) हा १० वर्ष कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणेबाबत बँक ऑफ इंडिया पत्ता–११६२/६,शिवजीनगर जवळ, ऑब्झवेटरी, गणेशखिंड रोड, पुणे–०५ यांनी शीघ्रसिद्ध गणकानुसार व मनपा निर्धारित मासिक रक्कम देऊ केलेली रक्कम रूपये २,४७,५६३/–(अक्षरी र.रूदोनलाख सत्तेचाळीसहजार पाचशेत्रेसष्ट फक्त) अधिक शासकीय कर व दर ३ वर्षांनी १२% भाडेवाढ याप्रमाणे आणि शासकीय नियमानुसार प्रतिमहा

**मक्ता रकमेवर वस्तू व सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस ताबा दिनांकापासून १० वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील नियमानुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ४८ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ४९**

पुणे खराडी स.नं.७२/२/१ व १ व येथील ॲमेनिटी स्पेस जागेवरील चारचाकी वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरीता चालविणेस देणेबाबत, मा.अति.महापालिका आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/११०, दि.१८/०५/२०२२ चे पत्र

**ठराव क्रमांक :– ६८**

**संदर्भ–**
**१) मा.अति.महापालिका आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/११०,दि.१८/०५/२०२२ चे पत्र.**
**२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.२५,दि. २७/५/२०२२.**
**३) स्थायी समिती ठराव क्र.२०७,दि.२७/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**पुणे खराडी स.नं.७२/२/१ व १ व येथील ॲमेनिटी स्पेस जागेवरील चारचाकी वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरीता चालविणेस देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या२ निविदांपैकी निविदेतील सर्वाधित दर देणारे निविदादार ई ऑन खराडी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,टेकपार्क वन, टॉवर–ई,१९१,पुणे–४११००६ यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ३०,९०,३०९.००(अक्षरी रक्कम रूपये तीस लक्ष नव्वदहजार तीनशे नऊ फक्त) ही मनपा निर्धारीत रक्कम रूपये ३०,००,३००.०० (अक्षरी रक्कम रूपये तीस लक्ष तीनशे फक्त) पेक्षा रक्कम रूपये ९०,००९.०० (अक्षरी रक्कम रूपये नव्वदहजार नऊ फक्त) (३%) ने जास्त आहे. तरी सदर निविदा स्विकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी शर्तीप्रमाणे प्रतिवर्षी मक्ता रकमेवर २% आयकर घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ४९ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ५०**

पुणे खराडी स.नं.५७/५ येथील मिळकतीवर राबविणेत येत असलेल्या पुणे महानगरपालिकेच्या गृहप्रकल्पाच्या ले–आऊट मधील सदनिकांसाठी विद्युत व्यवस्था आवश्यक असल्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या ताब्यातील जागा ट्रांन्सफॉर्मर बसविणेसाठी महाराष्ट्र विद्युत कंपनी यांना ७५ चौ.मी.जागा ३० वर्षे कालावधीसाठी नाममात्र भाडे र.रू.१/– स्विकारून देणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माल व्यव./११६,दि.२५/०५/२०२२ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ६९**

**संदर्भ–**
**१) कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री आवास योजना यांचे जा.क्र.झचअध/१४३,दि.०९/०४/२०२१चे पत्र.**
**२) कार्यकारी अभियंता,नगररोड विभाग,यांचे जा.क्र.का.आ./न.रो.वि./तां/१५०९ दि.२८/०६/२०२१**
**३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माल व्यव./११६,दि.२५/०५/२०२२ चे पत्र.**
**४) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २६, दि. २७/५/२०२२**
**५) स्थायी समिती ठराव क्र.२०८,दि.२७/५/२०२२**

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**पुणे खराडी स.नं.५७/५ येथील मिळकतीवर राबविणेत येत असलेल्या पुणे महानगरपालिकेच्या गृहप्रकल्पाच्या ले–आऊट मधील सदनिकांसाठी विद्युत व्यवस्था आवश्यक असल्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या ताब्यातील जागा ट्रांन्सफॉर्मर बसविणेसाठी महाराष्ट्र विद्युत कंपनी यांना ७५ चौ.मी.जागा ३० वर्षे कालावधीसाठी नाममात्र भाडे र.रू.१/– स्विकारून देणेबाबत मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ५० संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

विषय क्र. ५१

पुणे स.नं.१४६ कात्रज (क्षेत्रफळ ९.५४ हेक्टर) येथील मासेमारी तलाव ५ वर्ष कालावधीसाठी लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वावर देणेबाबत, मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांचे जा.क्र.मआ/माव्य/११८,दि.२५/०५/२०२२ चे पत्र

ठराव क्रमांक :– ७०

संदर्भ– १) मा.महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांचे जा.क्र.मआ/माव्य/११८,दि.२५/०५/२०२२ चे पत्र.
२)मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.२७,दि.२७/५/२०२२
३) स्थायी समिती ठराव क्र.२०९,दि.२७/५/२०२२

-----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे स.नं.१४६ कात्रज (क्षेत्रफळ ९.५४ हेक्टर) येथील मासेमारी तलाव ५ वर्ष कालावधीसाठी लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वावर देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ५ निविदांपैकी सर्वात जास्त रक्कम देणारे अ.क्र.१ चे निविदाधारक श्री.अनिल मनोहर कांबळे, पत्ता–सर्वे जुना ११० नविन १३३ फुरसुंगी, पुणे–४१२३०८ यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रूपये ११,११,१११/–(अक्षरी रक्कम रू. अकरालाख अकराहजार एकशेअकरा फक्त) ही मनपा निर्धारीत वार्षिक रक्कम रूपये ४,५००/– (अक्षरी रक्कम रू. चारहजार पाचशे फक्त) ने र.रू.११,०६,६११ ने जास्त रक्कम प्राप्त झाली आहे. त्याप्रमाणे शासकीय नियमानुसार प्रतिमहा मक्ता रकमेवर वस्तू व सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस ताबा दिनांकापासून ५ वर्षे व दर ३ वर्षांनी १२% भाडेवाढ कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील नियमानुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

निर्णय :– विषय क्र. ५१ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ५२

पुणे पेठ कोथरूड स.नं.७/३+४,२३/३+४ पिनॅक कॉम्पलेक्स या इमारतीमधील तळ मजल्यावरील खोल्यासह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांना भाडे तत्वावर उपलब्ध करून देणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचेजा.क्र.मआ/माव्य/ ११९, दि.२५/०५/२०२२ चे पत्र

ठराव क्रमांक :– ७१

संदर्भ– १) सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विभागाकडील जा.क्र.६६३९/२२,दि.०४/०५/२०२२ रोजीचे पत्र.
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/११९,दि.२५/०५/२०२२ चे पत्र.
३) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र.२८, दि.२७/५/२०२२
४) स्थायी समिती ठराव क्र.२१०,दि.२७/५/२०२२

-----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ कोथरूड स.नं.७/३+४,२३/३+४ पिनॅक कॉम्पलेक्स या इमारतीमधील तळ मजल्यावरील खोल्यासह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांना भाडे तत्वावर उपलब्ध करून देणेबाबत खालील बाबींचे अवलोकन करून नोंद घेण्यात येत आहे.

१) पुणे पेठ कोथरूड स.नं.७/३+४, २३/३+४ पिनॅक कॉम्पलेक्स या इमारतीमधील तळ मजल्यावरील सुमारे १६४४चौ.फुट जागा मा.सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे मनपाने निश्चितकेलेल्या भाड्याने उपलब्ध करून देणेस.

२) मा.सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेबरोबर १५ वर्षे कालावधीचा करारनामा करणेस.

३) मिळकतवाटप नियमावलीनुसार भाड्यामध्ये दर ३ वर्षांनी १२% भाडेवाढ करणेस.

निर्णय :– विषय क्र. ५२ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ५३

महिला आर्थिक विकास महामंडळ यांना एक्सलन्स सेंटर प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करून मिळणेबाबत, मा.महापालिका आयुक्त यांचेजा.क्र.मआ/माव्य/ १२०,दि.२५/०५/२०२२ चे पत्र

ठराव क्रमांक :– ७२

संदर्भ– १) इकडील आ.क्र.८७६१,दि.०३/०२/२०२२ रोजीचे पत्र
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१२०,दि.२५/०५/२०२२ चे पत्र.
३) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २९, दि. २७/५/२०२२
४) स्थायी समिती ठराव क्र.२११,दि.२७/५/२०२२

-----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

महिला आर्थिक विकास महामंडळ यांना एक्सलन्स सेंटर प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध करून मिळणेबाबत खालील बाबींचे अवलोकन करून नोंद घेण्यात येत आहे.

१)महिला आर्थिक विकास महामंडळ यांना सावरकर भवन येथील तळमजल्यावरील २ गाळे एस.जी.७ व एस.जी.–८ (९७.४१ चौ.मी.क्षेत्रफळ) मासिक भाडे र.रू.३८४३२/– इतके आकारून ५ वर्षे कालावधीकरीता मिळकतवाटप नियमावली सन २००८ च्या अटी शर्तीस अधीन राहून भाडे तत्वाने देणेस.

निर्णय :– विषय क्र. ५३ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.

विषय क्र. ५४

प्रभाग क्र.९ मौजे बालेवाडी, स.नं.५ व १९ येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या इमारतीत इंग्रजी माध्यमाची सी.बी.एस.ई (C.B.S.E.) बोर्डाची माध्यमिक शाळा नव्याने सुरू करणे, मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ माध्यमिक व तांत्रिक शि./१२१, दि.२५/०५/२०२२

ठराव क्रमांक :– ७३

संदर्भ– १) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.नमाशा २००९/(४९७/०९)/माशी–१, दि.११/०६/२००९.
२) महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.३७,दि.१४/०८/२०१९.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.७४६,दि.१९/०८/२०१९
४) मा.महापालिका सभा ठराव क्र.३२७,दि.२८/०८/२०१९
५) मा.अमोलरतन बालवडकर, सभासद,पुणे मनपा यांचे पत्र दि.२२/०४/२०२१
६) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माध्यमिक व तांत्रिक शि./१२१,दि.२५/०५/२०२२
७) मा. महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र. ४, दि. २७/५/२०२२
८) स्थायी समिती ठराव क्र.२१३,दि.२७/५/२०२२

-----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

प्रभाग क्र.९ मौजे बालेवाडी, स.नं.५ व १९ येथे पुणे महानगरपालिकेच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या इमारतीत इंग्रजी माध्यमाची सी.बी.एस.ई (**C.B.S.E.**) बोर्डाची माध्यमिक शाळा नव्याने सुरू करणेसाठी खालील बाबींस मान्यता देण्यात येत आहे.

१)जाहीर प्रकटनाद्वारे 'कक्षा अकॅडमीक फौंडेशन',३७९ अशोक होल्ट इमारत, पंडित जवाहरलाल नेहरू रोड, सीताबर्डी, नागपूर–४४००१२ या स्वयंसेवी संस्थेचा प्राप्त झालेला प्रस्ताव मान्य करणेस.

२)संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयानुसार नव्याने सुरू होणाऱ्या शाळेस शासनाची मान्यता प्राप्त होईल या भरवशावर जाहीर प्रकटनातील अटी व शर्ती विचारात घेऊन पुणे महानगरपालिका 'कक्षा अकॅडमीक फौंडेशन',३७९ अशोक होल्ट इमारत, पंडित जवाहरलाल नेहरू रोड, सीताबर्डी, नागपूर–४४००१२ या स्वयंसेवीसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने सन २०२२–२३ शैक्षणिक वर्षात विषयांकित ठिकाणी महानगरपालिकेच्या शाळा इमारतीत द्विलक्षी अभ्यासक्रमाने इंग्रजी माध्यमाची सी.बी.एस.ई.(**C.B.S.E.**) बोर्डाची माध्यमिक शाळ ।नव्याने सुरू करणेस.

३)जाहीर प्रकटनातील अटी व शर्तींची पूर्तता करणेसाठी पुणे महानगरपालिका व कक्षा अकॅडमीक फौंडेशन या दोघांमध्ये करार करणेस.

**निर्णय :– विषय क्र. ५४ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ५५**

महाराष्ट्र शुश्रुषागृहे नोंदणी नियम २०२१ शासन अधिसुचनेची अंमलबजावणी करणेबाबत, मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१३४, दि. ३०/५/२०२२ चे पत्र

**ठराव क्रमांक :– ७४**

**संदर्भ–** १) सार्वजनिक आरोग्य विभाग, १० वा माळा, जी.टी. रूग्णालय आवार, नवीन मंत्रालय मुंबई – ४००००१ चे महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग– चार–ब, गुरूवार, जानेवारी १४, २०२१/ पौषशके १९४९ चे असाधारण क्रमांक – २०.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९७१ दि. १६/३/२०२१ चे पत्र.
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. २५७९, दि. २९/०३/२०२२.
४) मा. मुख्य सभा ठराव क्र. १०, दि. ११/०४/२०२२.
५) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१३४, दि. ३०/५/२०२२ चे पत्र
६) स्थायी समिती ठराव क्र.२२४,दि.३/६/२०२२

-----

**स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –**

**महाराष्ट्र शुश्रुषागृहे नोंदणी नियम २०२१ शासन अधिसुचनेची अंमलबजावणी करणेसाठी प्रस्तावात दुरूस्ती करून मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या संदर्भ क्र. ३व ४ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यते मधील मुद्दा क्र. ३ मध्ये खालीलप्रमाणे सुधारीत बदल करणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे सुधारीत दुरूस्ती प्रस्तावात खालीलप्रमाणे दुरूस्ती करून व सदरच्या सुधारीत दुरूस्ती प्रस्तावास खालील बाबींस मान्यता देण्यात येत आहे.**

**१. मा. स्थायी समिती ठराव क्र. २५७९, दि. २९/३/२०२२ व मा. मुख्य सभा ठराव क्र. १०, दि. ११/०४/२०२२ मधील मुद्दा क्र. १,२,४,५,६,७ कायम ठेवणेस.**

**२. मा. स्थायी समिती ठराव क्र. २५७९, दि. २९/३/२०२२ व मा. मुख्य सभा ठराव क्र. १०, दि. ११/०४/२०२२ मधील मुद्दा क्र. ३ मध्ये अधिसुचनेनुसार वार्षिक परवानाशुल्क/फी आकारणी१ ते ५ खाटांसाठी रक्कम रू. ५०००/– व ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला पुढील प्रत्येकी ५ वाढीव खाटांच्या टप्प्यासाठी रक्कम रू. ५०००/– प्रति ५ खाटा प्रमाणेवाढीव शुल्क आकारणेस ऐवजी**

**खालील प्रमाणे सुधारीतदुरूस्ती करणेस**

**अधिसुचनेनुसार नुतनीकरण/नोंदणीचे तीन वर्षाकरिताची परवाना शुल्क/फी आकारणी१ ते ५ खाटांसाठी रक्कम रू. ५०००/– व ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला पुढील प्रत्येकी ५ वाढीव खाटांच्या टप्प्यासाठी रक्कम रू. ५०००/– प्रति ५ खाटा प्रमाणेवाढीव शुल्क आकारणेस.**

**निर्णय :– विषय क्र. ५५ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ५६**

पुणे स्टेशन कै. तुकारामशेठ शिंदे वाहनतळ बेसमेंट, तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला व टेरेस येथील दुचाकी वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरिता चालविणेस देणेबाबत, मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/१४२, दि. २/६/२०२२ चे पत्र

**ठराव क्रमांक :– ७५**

**संदर्भ–** १) टेंडर क्र. प्रकल्प – ३– २०२२
२) पार्किंग पॉलिसी बाबत मा. मुख्य सभा ठराव क्र.१०९२, दि. २३/०३/२०१८.

३) मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/प्रकल्प/१४२, दि. २/६/२०२२ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२३२,दि.१०/६/२०२२

-----

स्थायी समितीची शिफारस विचारात घेऊन –

